दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २४६ वा | रविवार दि. २ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## मोर्चा चुकीच्या ठिकाणी काढला : एकनाथ शिंदे



**मुंबई ।** ईडी, सीबीआयची चौकशी लागली तर यांची बोंब सुरू झाली. मुंबई महापालिकेत भ्रष्टाचार झाला म्हणून बोलत सुटले. पण चोरांच्या उलट्या बोंबा सुरू झाल्या. मुळात मोर्चा चुकीच्या ठिकाणी काढला आहे. खरा मोर्चा मातोश्री-१, २ वर निघायला पाहिजे, पण त्यांना माहित आहे. सगळ तिथेच घडले आहे. असा पलटवार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. ठाकरे गटाच्या वतीने मुंबईत काढण्यात आलेल्या विराट मोर्चाला शिंदेंनी प्रत्युत्तर दिले.

### न्यूज कॉलम

### मुख्यमंत्री दौऱ्यासाठी २७ अधिकारी नियुक्त

**धुळे ।** शासन आपल्या दारी' अभियानातंर्गत होणारा धुळे जिल्हास्तरीय कार्यक्रम येत्या १० जुलै रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत नियोजित आहे. यासाठी २७ अधिकारी नियुक्त केले आहेत. अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, सहाय्यक जिल्हाधिकारी, धुळे उपविभाग श्रीमती तृप्ती धोडमिसे, निवासी उपजिल्हाधिकारी नितीन गावंडे, अरविंद अंतुर्लीकर, कुरबान तडवी यांच्यासह अन्य अधिकारी नियुक्त केले आहे.

### शहादा येथे कार झाडावर आदळली

**शहादा ।** शहादा-डोंगरगाव रस्त्यावरील महावीर इंग्लिश मीडियम स्कूलसमोर चार चाकीचा अपघात झाल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. किया सेलटॉस गाडी (क्रमांक एम एच १५ एच जी ९८०१) डोंगरगावकडून शहादाकडे येत असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी झाडावर आदळली. यात विजय श्रावण सोनवणे (वय २३, रा.डोंगरगाव) व अमरसिंग धनसिंग गिरासे उर्फ सनी (वय २८, रा. लोणखेडा) यांचा जागीच मृत्यू झाला.

# जमावबंदी फक्त आनंद लोंढे, शंकर खरात, किरण गायकवाड यांच्याच आंदोलनाला लागू होते का?

## प्रशासन नेमके कुणाचे काम करीत आहे? मिलींद बैसाणे यांचा पत्रकातून सवाल

**धुळे । प्रतिनिधी**



अलीकडे राज्यातील विविध भागांसह धुळे जिल्ह्यात संवेदनशील परिस्थिती निर्माण झाली आहे. मूर्ती विटंबना, अवैध स्मारकाचा वाद, नेतेमंडळींची एकमेकांवर अत्यंत खालच्या पातळीवर जावून केली जाणारी टीकाटिप्पणी, आक्षेपार्ह वक्तव्ये, धार्मिक असंवेदनशीलता अशा अनेक मुद्द्यांवर धूसफूस सुरुच आहे. अशा परिस्थितीतच प्रशासनाने धुळ्यात सध्या जमावबंदी लागू केलेली आहे. अलीकडेच जमावबंदी लागू असताना दोन मोठमोठे मोर्चे निघाले. परिस्थितीवर पोलीस खात्याने चांगले नियंत्रण ठेवल्याने दोन्हीही मोर्चातून अपवाद वगळता चांगली शिस्त दिसून आली. जमावबंदी असतानाही पोलीसांनी दोन्ही मोर्चांच्या नेतेमंडळींवर काही कारवाई केली नाही किंवा नोटिसाही बजावल्या नाहीत. त्यामुळे शहरातील तणाव कमी झाला. शांततेचे वातावरण निर्माण झाले.

मात्र आता कालपरवा झालेल्या चंद्रशेखर आझाद यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणी धुळे जिल्ह्यातील आंबेडकरी विचारसरणीचे सर्वपक्षीय आंदोलनप्रकरणी आनंद लोंढे, किरण गायकवाड, शंकर खरात, भैय्या पारेराव, श्रीकृष्ण बेडसे यांच्यासह आंदोलकांविरुध्द जमावबंदीचे उल्लंघन केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही जमावबंदी फक्त आनंद लोंढे, शंकर खरात या तरुण, तडफदार नेतृत्वाखालील आंदोलनालाच लागू होते का? असा स्पष्ट सवाल जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष मिलींद बैसाणे यांनी उपस्थित केला आहे. इतरांना जमावबंदीत बेलगाम सूट देणारे पोलीस प्रशासन नेमके कुणाचे काम करीत आहे? अशी विचारणाही बैसाणे यांनी या पत्रकातून केली आहे. प्रशासनावर असलेल्या दबावाची ही प्रचितीच आहे असेही बैसाणेंनी म्हटले आहे.



मुळातच हे निषेध आंदोलन का व कशासाठी होते हे प्रशासनाला समजले नाही की समजून घ्यायचे नाही हा प्रश्नच आहे. आझाद समाज पार्टी तथा भीम आर्मीचे सर्वेसर्वा चंद्रशेखर आझाद यांच्यावर उत्तर प्रदेशात गोळीबार करण्यात आला. यात आझाद जखमी झाले. याप्रकरणी आझाद समाज पार्टीचे प्रदेश कार्याध्यक्ष आनंद लोंढेसह भीम आर्मीचे नेते, कार्यकर्त्यांनी आझाद यांना सुरक्षा व्यवस्था देण्यासह हल्लेखोरांना शोधून कारवाई करण्याची मागणी करीत मोर्चा न काढता धुळ्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या पुतळ्याजवळ जमून संवैधानिक, लोकशाही मार्गाने आंदोलन केले. हे आंदोलन जमावबंदी आदेशाच्या कक्षेत येत असले तरी आंदोलनाचा विषय पोलीस प्रशासनाने समजून घेणे महत्वाचे होते. कारण एक् राजकीय पक्षाच्या नेत्यावर जीवघेणा हल्ला होत असेल तर त्या पक्षाचे कार्यकर्ते घरात शांत बसून राहू शकत नाहीत. भीम आर्मीच्या आंदोलकांनी सनदशीर मार्गाने शिस्तीत आंदोलन केले. पोलीस प्रशासनाला मागण्यांचे निवेदन दिले. रस्त्यावर उतरुन कुणाचे नुकसान केले नाही. कुठे अडथळे आणले नाहीत. मात्र तरी जमावबंदीचे निमित्त पुढे करीत लोंढेंसह आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात आला. अलीकडेच धार्मिक एकता बिघडवू पाहणार्या प्रवृत्तींच्या पुढाकाराने मोठा मोर्चा जमावबंदीच्या काळात निघाला. त्यांना सूट मात्र लोंढेंवर कारवाई ही बाब पोलीस प्रशासन कुणाच्या तरी इशार्यावर काम करीत आहे हे स्पष्ट करणारी आहे. संवैधानिक मार्गाने न्यायासाठी उठविलेला आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा फॅसिझम पोलीस प्रशासन राबवित आहे. ठरवून, टार्गेट करुन, सत्तेच्या दबावाला पोलीस प्रशासन बळी पडत आहे. लोंढेंवर दाखल केलेला गुन्हा हा त्याचाच भाग आहे. त्यामुळे पोलीस प्रशासन नेमके कुणाचे काम करीत आहे हा समाजमनाचा प्रश्न आहे. कायद्याच्या आडून सत्ताधीरींचाच कृतीकार्यक्रम पोलीस राबवित आहे. बाकीच्यांना सूट देत फक्त आनंद लोंढेंच्याच आंदोलनाला जमावबंदी लागू करणे हा एकतर्फी आहे. प्रशासनाने 'चोर सोडून संन्याशाला फाशी' देण्याचे धोरण न राबविता आनंद लोंढेंवर दाखल केलेला गुन्हा मागे घ्यावा. तसेच त्याच्या मागण्या वरिष्ठांपर्यंत पोहचवाव्या ही आग्रहाची मागणी रास्तच आहे असे स्पष्ट मत मिलिंद बैसाणे यांनी पत्रकातून नोंदवले आहे. सदर पत्रकावर मुकुंदराव शिरसाठ, रोहित सोनवणे इत्यादींच्या सह्या आहेत.

# खासगी बसचा भीषण अपघात, २५ जणांचा होरपळून मृत्यू



**बुलढाणा । प्रतिनिधी**

नागपूरहून पुण्याकडे निघालेल्या खासगी लक्झरी बसचा भीषण अपघात झाला असून अपघातानंतर बसला लागलेल्या आगीत २५ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला आहे. बसमध्ये एकूण ३३ प्रवासी होते, त्यातील ८ प्रवासी अपघातानंतर बाहेर पडले. बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाजवळ समृद्धी महामार्गावर हा अपघात झाला. बुलढाण्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी ही माहिती दिली आहे.

समृद्धी महामार्गावर ही बस नागपूरहून पुण्याकडे येत होती. बस मध्ये नागपूर, वर्धा आणि यवतमाळ जिल्ह्यातील प्रवासी होते. ही बस विदर्भ ट्रॅव्हल्सची होती. पिंपळखुटा गावालगत समृद्धी महामार्गावरून जात असताना बस दुभाजकाला धडकली, त्यानंतर बसने पेट घेतला. बस मध्ये असणाऱ्या प्रवाशांना बाहेर पडता आले नाही. बस पलटी झाल्याने बसचा दरवाजा हा खालच्या भाग बाजूला आला त्यामुळे प्रवाशांनी बसच्या काचा फोडून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीदेखील या घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून घटना हृदयद्रावक असल्याचे म्हटले आहे. याबाबत ड्रायव्हरला विचारलं असता टायर फुटल्यानं बस जाऊन आदळल्याचं त्यानं सांगितलं. त्यानंतर खांब बाजूला जाऊन उडाला. त्याचवेळी बस पुढे जाणाऱ्या डिझेल टँकरवर जाऊन आदळली. डिझेल टँकचा स्फोट झाला आणि मोठ्या स्फोट झाला. स्फोट झाल्यानंतर गाडी सुमारे ३० ते ४० फुट पुढे जाऊन पलटी झाली आणि अचनाक गाडीत आग लागली. अशी माहिती पोलीस अधिक्षकांनी दिली.

### पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केल्या संवेदना

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर आपल्या संवेदना व्यक्त केल्या आहेत. या घटनेतील प्रवाशांच्या नातेवाईकांना दोन लाख रुपये तर जखमी प्रवाशांना पन्नास हजार रुपयांचे भरपाई देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे.**

# नंदुरबारात तीन लाख रुपयाच्या विदेशी दारुसह रोख रक्कम जप्त

**नंदुरबार । प्रतिनिधी**



शहरातील बायपास रस्त्यावरील उड्डाणपुलाखाली नंदुरबार शहर पोलीस (श्रिळलश) ठाण्याच्या पथकाने २ लाख ९७ हजार ७८० रुपयांचा विदेशी मद्यसाठा असलेले बोलेरो वाहन जप्त केले आहे. पोलीसांना पाहून चालकाने वाहन दूर अंतरावर उभे करुन पळ काढला आहे. याप्रकरणी चालकासह दारु मालकाविरुद्ध शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाहन व रोख रकमेसह ६ लाख ७२ हजार ७८० रुपये किमतीचे मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि.३० जून रोजी पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील यांना एक पांढर्या रंगाची महिंद्रा कंपनीचे बोलेरो चारचाकी वाहन (क्रमांक एमएच-१८--जे-०९९५) ही उमर्दे गावाकडून नंदुरबार शहराकडे अवैध दारू घेवून येणार आहे, अशी माहिती मिळाली. त्यावरून त्यांनी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रविंद्र कळमकर यांना कारवाईचे आदेश दिले. श्री. कळमकर, पोलीस उपनिरीक्षक विकास गुंजाळ, पोकॉ अनिल बर्डे, पोकॉ युवराज राठोड, आदींच्या पथकाने शहरातील जगतापवाडी उड्डानपुलाच्या खाली उमर्दे रोडवर सापळा लावला. बोलेरो वाहन उड्डाणपुलाच्या खाली आल्यावर श्री. कळमकर यांनी थांबविण्याचा इशारा दिला. परंतू चालकास संशय आल्याने काही अंतरावर वाहन उभे करून वाहन सोडून पळ काढला. त्याचा पोलीस पथकाने शिताफीने पाठलाग करून त्यास जागीच पकडले.

शेख अदील शेख रऊफ (वय- २६ वर्षे, रा. गाझी नगर नंदुरबार),याला ताब्यात घेतले. पथकातील अधिकारी अंमलदारांनी संशयित वाहनाची दोन पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात बेकायदेशीर वाहतुक करीत असलेली दारू मिळून आली. या वाहनात एकुण ६ लाख ७२ हजार ७८० रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलीसांना आढळून आला. सदर दारू कोणाची आहे? याबाबत आरोपीत यास विचारणा केली असता ती अरूण चौधरी रा. नंदुरबार यांची असल्याची सांगितले. सदर कारवाई पोलीस अधीक्षक पी. आर. पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक, निलेश तांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रविंद्र कळमकर, पोलीस उपनिरीक्षक विकास गुंजाळ, पोकॉ अनिल बर्डे, पोकॉ युवराज राठोड, यांच्या पथकाने केली.

# ग्रामीण पदाधिकाऱ्यांचा शिवसेना, युवासेनेत प्रवेश



**नाशिक । प्रतिनिधी**

महायुती सरकारच्या प्रथम वर्षपूर्तीचे निमित्त साधून विविध संघटनांच्या, महिलांचे, ग्रामीण पदाधिकाऱ्यांनी पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत सह संपर्क प्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, अनिल ढिकले, महानगर प्रमुख प्रविण तिदमे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत प्रवेश केला.

नाशिक महापालिका क्षेत्रातील जाधव संकुल, सिडको परिसर येथील ज्योती शिंदे, प्रियांका सिंघ, जायदा शेख, मंगला जाधव, सुरेखा क्षिरसागर, शारदा थेटे , धनश्री मोहिते, पल्लवी शेळके, सुनिता पाटील, लिलावती भगत, सुमन जोपाळे, इंदुबाई बोरसे, पुष्पा हिरे, संगीता वडतेले, भारती साळवे, नेहा मराठे, संगीता गांगुर्डे, कुंदा शिंदे, आशा सावकार, जिजाबाई माळी, रेवती शेंबेकर, प्रतिभा जगताप, अनिता शेळके, भारती परांडे या महिलांनी शिवसेनेत प्रवेश केला.

नाशिक ग्रामीण त्र्यंबकेश्वर तालुक्यातील पप्पू मेढे, बाळू बोडके, किरण मेढे, जग्गू मेंढे, राहुल मेढे, सचिन मेढे, राहुल चव्हाण, राहुल प्रकाश मिंदे, रोशन बोडके, बापू नाठे, बाळू बोडके, शुभम बोडके, बाळासाहेब बोडके वाळूजे, जगदीश मेढे, बाळू बोडके, शिवम बोडके, बापू नाठे, रोषण बोडके, पंकज मुळाणे यांनी युवासेनेत प्रवेश केला. यावेळी शिवसेना पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

# अबब... एकाच रात्रीतून एक नव्हे तब्बल पाच दुकाने फोडली

### सोनगीर पोलीस यंत्रणा साखर झोपेत

**सोनगीर । प्रतिनिधी**

येथे एकाच रात्री पाच दुकाने फोडून चोरट्यांनी रोख रक्कम दुकानांमधील माल व काही वस्तू चोरून नेल्या आहेत. एकाच वेळेस एकाच ओळीत असणारे पाच दुकाने फुटल्याने व्यापारी वर्गात भीती पसरली आहे. दरम्यान, सदर चोरीचा प्रकार सोनगीर पोलीस स्टेशन पासून सुमारे १०० मीटर अंतरावर झाल्याने चोरांच्या धाडसाची चर्चा होत आहे. गेल्या काही दिवसांपासून येथे भुरट्या चोऱ्या सुरू आहेत. दि. ३० जुलै च्या मध्यरात्री सोनगीर पोलीस स्टेशन जवळच्या मुंबई आग्रा महामार्ग शेजारील सर्विस रोडला लागून असलेल्या दुकानांमध्ये धाडसी चोरींचा प्रकार उघडकीस आला.

येथील सेनादलातील सेवानिवृत्त जवान नंदकिशोर माळी यांच्या मंगलमूर्ती पेंट्स या दुकानाच्या भिंतीच्या स्वरूपात लावण्यात आलेला पत्रा उचकवून चोरट्यांनी दुकानातून, लिनिओ कंपनीचा २५ हजार रुपये किमतीचा टॅब लंपास केला. तसेच शेजारील भाईदास कृष्णा माळी यांच्या कृषिधन इरिगेशन या खते बी बियाणे खते विक्री दुकानाच्या मागील बाजूस असलेला लाकडी दरवाजा तोडून दुकानाच्या गल्ल्यातून सुमारे सात हजार दोनशे रुपये रोख तसेच स्वप्निल देशमुख यांच्या साई ट्रेडर या बी बियाणे खते विक्री दुकानातून सुमारे ६० हजार रुपये किमतीचे कापूस बियाण्याचे ६५ पॅकेट चोरून नेले. मागील काही दिवसांपूर्वीही चोरट्यांनी या दुकानातून माल चोरून नेला होता. आज पुन्हा या दुकानास टार्गेट करण्यात आले. या दुकाना शेजारी जुन्या लाकडापासून नवे फर्निचर बनवणाऱ्या कारागिरांच्या दुकान वजा घरातून कारागिरांचे नवे कपडे व कपड्यांचे खिशातील रोख तीन हजार रुपये चोरून नेले.

तसेच बालाजी कृषी सेवा केंद्र या दुकानातून ही चोरट्यांनी बियाणे पॅकेट लंपास केले. येथे चोरी झालेल्या मालाचा तपशील मिळू शकला नाही. सद्गुरु मोटर्स या मोटरसायकल विक्रीच्या दुकानाचे बाजूचे पत्रे उचकवण्याचा व शटर तोडण्याचा चोरट्यांनी प्रयत्न केला. पण सदर दुकानाचे पत्रे जमिनीत खोलवर गाडले असल्यामुळे व शटर नव्याने तयार केलेले असल्याने येथे चोरीचा प्रयत्न फसला. विशेष म्हणजे पोलीस स्टेशन पासून अवघ्या १०० मीटर अंतरावर चोरट्यांनी चोरी करून सोनगीर पोलिसांना जणू खुले आव्हान दिल्याचे दिसते. सोनगीर गावात व कॉलनी परिसरात गेल्या काही दिवसांपासून लहान मोठ्या चोऱ्या सुरू आहेत पण या चोऱ्यांचा अद्याप तपास लागत नसल्याने जनतेत नाराजीचा सूर आहे. मागील काही दिवसांपूर्वी येथील पोलीस ठाण्यात व्यापारांची बैठक घेऊन आपल्या दुकानांमध्ये व दुकानात बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे असल्याचे आग्रही मत येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड यांनी व्यक्त केले होते.

# वॉटरग्रेस प्रोडक्ट्स कंपनीवर तात्काळ फौजदारी, दिवाणी स्वरुपाचे गुन्हे दाखल करा

### मनसे शहराध्यक्ष दिलीप दातीर यांची मागणी

**नाशिक । प्रतिनिधी**



मनसे शहराध्यक्ष दिलीप दातीर आणि पदाधिकाऱ्यांनी काल मनपा आयुक्तांची भेट घेऊन वॉटरग्रेस प्रोडक्ट्स कंपनीला कायम स्वरूपी मनपाच्या काळ्या यादीत टाकून या कंपनीवर दिवाणी तसेच फौजदारी गुन्हा दाखल करण्यात या यावा अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.

याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष ड. रतनकुमार इचम, शहराध्यक्ष दिलीप दातीर,उपजिल्हाध्यक्ष अनंत सांगळे, कामगार सेनेचे प्रदेश चिटणीस तुषार जगताप, उपशहराध्यक्ष अक्षय खांडरे, मनविसे प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, मनविसे शहर संघटक ललित वाघ, अक्षय कोंबडे, मेघराज नवले, किरण शिंदे, अभिजीत सांगळे आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, वॉटरग्रेस प्रोडक्ट्स कंपनीने कशा प्रकारे बेकायदेशीररीत्या अनेक करारनामे करून मनपाची दिशाभूल केली आहे याचा उहापोह केला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारी जागा नाममात्र भाड्याने कोणालाही जागा वापरता येणार नसल्याच्या निकालाचा हवाला दिला असून महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम ७९ मधील मनपाची जागेचा खाजगी संस्थेद्वारे गैरवापर होत असेल तर मनपाच्या नियमांप्रमाणे त्यांच्यावर कारवाई करता येते. या नियमाप्रमाणे तात्काळ वॉटरग्रेस प्रोडक्ट्स कंपनीवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मनपा प्रशासनाकडून शासनाच्या नियमांचे पालन होणे अपेक्षित असून मनपा आयुक्तांना असलेल्या अधिकाराप्रमाणे कोणालाही एका वर्षापेक्षा अधिक वाढ देता येत नाही. मग वॉटरग्रेस प्रोडक्ट्स कंपनीला नाशिक शहरातील रुग्णालयांच्या बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेन्टसाठी कुठल्या नियमाप्रमाणे करारात वाढ दिली गेली आहे? असा प्रश्न उपस्थित करत कंपनीने सदर करारनाम्यात छेडछाड केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.स्थायी समिती, सभा क्र. ५९, ठराव क्र. १२७८, दि. १५ फेब्रुवारी२००१ प्रमाणे करारनामा फक्त ११ वर्षांचा असणे अपेक्षित असतांना ठेकेदाराने तत्कालीन मनपा अधिकाऱ्यांच्या संगनमताने २१ वर्षांचा बेकायदेशीर करारनामा करून मनपाची शेकडो करोडोची फसवणूक केल्याचे दिसून येते. तसेच जा. क्र. मनपा/आरोग्य/वशी/१५८०/२०१५, दि. ४ ऑगस्ट २०१५ प्रमाणे तत्कालीन अतिरिक्त आयुक्त यांनी मनपाचे देय पैसे थकवले म्हणून सदर ठेकेदारास काळ्या यादीत टाकले होते.

यावेळी प्रदेश सरचिटणीस अशोक मुर्तडक, प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष ड. रतनकुमार इचम, शहराध्यक्ष दिलीप दातीर,उपजिल्हाध्यक्ष अनंत सांगळे, कामगार सेनेचे प्रदेश चिटणीस तुषार जगताप, उपशहराध्यक्ष अक्षय खांडरे, मनविसे प्रदेश उपाध्यक्ष संदीप भवर, मनविसे शहर संघटक ललित वाघ, अक्षय कोंबडे, मेघराज नवले, किरण शिंदे, अभिजीत सांगळे आदी उपस्थित होते.

# शालेय संस्थेत फसवणूक चौघांविरुद्ध गुन्हा

**धुळे । प्रतिनिधी**

शहरातील अंजुमन फरोग ए तालीम संस्था संचलीत, नॅशनल उर्दू हायस्कूल, धुळे व मालेगाव येथील शेख उस्मान शैक्षणिक संस्था संचलीत, शेख उस्मान हायस्कूल येथे खोटे व बनावट कागदपत्रे तयार केली, बनावट ठराव केल्याप्रकरणी चौघांवर चाळीसगाव रोड पोलिसात गुन्हा दाखल झाला.

याबाबत मुनाफ रेहमान शेख यांनी पोलिसात फिर्यादी दिली. त्यानुसार धुळे शहरातील अंज्युमन फरोग ए तालीम संस्था संचलीत, नॅशनल उर्दू हायस्कूल, धुळे व मालेगाव येथील शेख उस्मान शैक्षणिक संस्था संचलीत, शेख उस्मान हायस्कूल, मालेगाव येथे संशयीतांनी गैरव्यवहार केला. महंमद हस्सान समसूल हक (रा. मौलवीगंज, धुळे), महमद उमर अब्दूल खालीफ (वय ६५ रा. आयशा नगर, धुळे), महमद याकुब समीउल्ला (वय ६३ रा. अन्सार चौक, वल्लीपुरा, धुळे), महमद सलमान शमसुल हक (रा. नुरबाग, मालेगाव) यांनी संगणमताने कटकारस्थान केले. खोटे व बनावट कागदपत्रे तयार केली, शालेय समितीचा बनावट ठराव तयार करून संस्थेच्या नावाचे बनावट पावती पुस्तकही तयार करून ते खरे असल्याचे भासविले. याप्रकरणी मुनाफ शेख यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार गुन्हा दाखल झाला.

## गुगली आणि विकेट


फडणवीस यांनी तीन-साडेतीन वर्षांपूर्वीच्या पहाटेच्या शपथविधीचा विषय उगाळून शिळ्या कढीला उत आणला आहे. कोण खरे? कोण खोटे? हे ठरवून ते पवार यांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करू पाहत आहेत.

शिंदे-फडणवीस सरकारला एक वर्ष पूर्ण होत असतानाच गेल्या चार वर्षांच्या राजकारणातील गौप्यस्फोट उघड होऊ लागले आहेत. मात्र, त्यावरून राजकारण्यांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी आमच्या सोबत दुहेरी खेळ (डबल गेम) केला, असा आरोप केला आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी, भाजपबरोबर सत्ता स्थापन करण्यास अनिच्छा दर्शवल्यानंतर आणि महाविकास आघाडी आकारास येत असतानाच भाजप आणि राष्ट्रवादीचे सरकार स्थापन करण्याचे ठरले होते. त्यासंदर्भात शरद पवार यांच्यासोबत बैठकही झाली होती, त्यांच्या होकारानंतरच फडणवीस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली सरकारचा आराखडा तयार झाला होता. मात्र, शरद पवारांनी ऐनवेळी त्यातून माघार घेतली, असे फडणवीस यांनी त्या मुलाखतीत म्हटले होते. फडणवीस यांचा हा आरोप नवा नाही. शरद पवारांना या शपथविधीची पूर्वकल्पना होती, असे फडणवीस यांनी याआधीही म्हटले होते. त्यावर फडणवीस असत्य बोलत आहेत, अशी प्रतिक्रिया देत पवार यांनी त्यांचा आरोप फेटाळून लावला होता. आता पुन्हा ताज्या फडणवीसांच्या मुलाखतीतून हा विषय पुढे आला तेव्हा शरद पवार यांनी भाजप आणि फडणवीस सत्तेसाठी कुठल्या थराला जाऊ शकतात हे उघड करण्यासाठीच आपण टाकलेली ती 'गुगली' होती. त्यामुळे फडणवीसांची 'विकेट' कशी पडली हे स्पष्ट केले. पवार यांनी या संदर्भात चर्चा आणि बैठकाही झाल्याचे मान्य केले. फडणवीस यांना सत्तालोलूप ठरवताना त्यांच्या सोबत उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतलेले आपले पुतणे अजित पवार यांना त्यांनी अडचणीत आणले आहे. शिवसेनेतून चाळीस आमदारांना घेऊन बाहेर पडलेल्या एकनाथ शिंदे यांच्या कृतीला गद्दारी म्हणून संबोधताना पवार १९७८ मध्ये वसंतदादा पाटील यांचे सरकार पाडण्याच्या कृतीला राजकीय चतुराई समजतात! २०१४च्या निवडणुकीचे निकाल लागत असताना भाजपला आमदार कमी पडल्यास आपण बाहेरून पाठिंबा देऊ, असे पवारांनी जाहीर केले होते आणि त्यावर नंतर कधीतरी बोलताना युतीत असलेल्या शिवसेना आणि भाजप यांच्यात दरी निर्माण व्हावी यासाठी केलेली ती खेळी होती, असे पवार यांनी म्हटले होते. पवारांच्या अशा कृतीकडे राजकीय खेळी म्हणून पाहायचे, की त्यांची विश्वासार्हता कमी होत आहे, असे समजायचे?

पवारांची फलंदाजी

ताज्या पत्रकार परिषदेत पवार यांनी देशातील आणि राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवरही कडाडून टीका केली. सत्ता असलेली राज्ये भाजप सांभाळू शकत नाही. त्यामुळे आगामी निवडणुकीत काय होईल, या भीतीपोटी पंतप्रधान अशोभनीय वक्तव्ये करीत आहेत, अशी टीका पवार यांनी केली. समान नागरी कायद्यासारखा विषय उपस्थित करून सध्याच्या राज्यकर्त्यांबद्दल लोकांच्या मनात असलेली नाराजी आणि अस्वस्थता यापासून त्यांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न सत्ताधारी करीत आहेत. समान नागरी कायद्याबाबत विधी आयोगाकडे आलेल्या शिफारशी आणि समाजातील शीख, ख्रिश्चन आणि जैन समाजाच्या भूमिका समजावून घेतल्याखेरीज पुढे जाता येणार नाही, या पवारांच्या सल्ल्याकडे दुर्लक्ष कसे करता येईल? शिंदे-फडणवीस सरकारला लक्ष्य करताना गेल्या पाच महिन्यांत मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण वाढल्याचे सांगत पवार यांनी थेट आकडेवारीच वाचून दाखवली. महिला आणि मुलींवर हल्ले होण्याच्या घटनांचाही त्यांनी उल्लेख केला. इतर गोष्टींवर बोलण्यापेक्षा गृहमंत्र्यांनी यावर उपाययोजना कराव्यात, अशा कानपिचक्याही त्यांनी फडणवीसांना दिल्या. भाजपच्या हातातून अनेक राज्ये जात आहेत, जेथे त्यांची सत्ता नाही, तेथे फोडाफोडी करून सत्ता मिळवण्याचे प्रयत्न होत आहेत. भाजपची सत्ता असूनही मणिपूर दीड महिन्यापासून पेटले आहे. यावरही पवार यांनी बोट ठेवले आहे. मोदी यांनी त्यांच्या पदाला न शोभणारी वक्तव्ये करू नयेत, असा सल्ला पवार यांनी दिला आहे.

# उद्योगस्नेही मधुकर ब्राह्मणकर



नासिकमधील इलेक्ट्रो क्रीम्प कॉन्ट्रॅक्टस या जगातील ३५पेक्षा अधिक देशांना आपली उत्पादने निर्यात करणाऱ्या कंपनीचे संस्थापक श्री मधुकर ब्राह्मणकर यांचे बालपण ग्रामीण भागात कळवण येथे गेले .तेथेच त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शालेय शिक्षण घेतले. खरे तर त्यांच्या कुटुंबाचा किराणा मालाचा व्यवसाय ठीक चालला होता. परंतु कुटुंब वाढत गेलं. त्यामुळे एकाच व्यवसायात सर्वांचे भागेनासे झाले. त्यात उधारीमुळे व्यवसायाला अवकाळा येत गेली.

मधुकर ब्राह्मणकर आपल्या पाच भावंडात सर्वात मोठे. त्यांनी लहानपणापासूनच शालेय शिक्षणात चमक दाखवली. परंतु घरच्या परिस्थितीतील झालेल्या बदलातून बाहेर पडण्याकरता, शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे हे त्यांनी वेळीच हेरले व आर्थिक परिस्थिती नसताना नाशिकला येऊन श्री दादासाहेब बिडकर चालवीत असलेल्या डांग सेवा मंडळाच्या वस्तीगृहात त्यांनी प्रवेश मिळवला. तेथे निवास व जेवणाची सोय झाली. शालांत परीक्षेत त्यांनी उत्तम गुण मिळवले व पुण्यातील सर परशुराम भाऊ कॉलेज तसेच वाडिया इन्स्टिट्यूट मध्ये त्यांनी प्रवेश मिळवला. तिथेही त्यांचा पुणे विद्यार्थी गृहाच्या वस्तीगृहामुळे निवास व भोजनाचा प्रश्न मिटला. तेथे कमवा आणि शिका या पद्धतीवरचे शिक्षण असल्यामुळे त्यांना लहान मोठी कामे करावी लागत. पहिल्या वर्षी त्यांना अपयश आले .या अपयशाच्या काळातच म्हणजे १९६७ साली बिहारात महाभयंकर दुष्काळ पडला. जयप्रकाश नारायण यांच्या आवाहनावरून पुणे मुंबईतील अनेक युवक बिहारमधील दुष्काळग्रस्त भागातील दुष्काळात होरपळलेल्या जनतेसाठी चालवल्या जाणाऱ्या मोफत भोजनालयात स्वयंसेवी काम करण्यासाठी गेले. या तीन महिन्याच्या स्वयंसेवी कामातून त्यांचा जीवन विषयक दृष्टिकोन बदलला.

पुण्यात येऊन त्यांनी आपले पुढील शिक्षण यशस्वीरित्या पार पाडले. त्यानंतर मुंबईत अनेक ठिकाणी नोकरी केली .याच काळात बारीक-सारीक व्यवसाय करण्यासाठी प्रयत्न केले .कुटुंबातील सर्वात मोठे असल्यामुळे कुटुंबाला पुढे आणण्याकरता सतत मदत करीत राहिले .मुंबईत नोकरी करीत असतानाच त्यांचे लग्न झाले व दोन कन्यारत्न प्राप्त झाल्या .परंतु नोकरीत आपला फारसा विकास होणार नाही हे हेरून त्यांनी नासिक येथील परफेक्ट सर्कलमध्ये नोकरीस सुरुवात केली आणि नोकरी करता करता काही व्यवसाय सुरू करता येतो का याकरिता प्रयत्न सुरू केले .बघता बघता त्यांना लहान मोठे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टरची कामे मिळू लागली. हळू हळू या कामांचा विस्तार चार-पाच लहान मोठ्या कंपन्यांमध्ये झाला .आपल्या भावंडांनाही सुरुवातीपासूनच त्यांनी या कंपन्यांमध्ये सामावून घेऊन नंतर स्वतंत्र रित्या हा व्यवसाय देऊन टाकला.

१९९६ साली त्यांनीच इलेक्ट्रो क्रिम्प कॉन्ट्रॅक्टस ही कंपनी स्थापन करून ईलेक्ट्रीकल केबल लग्ज व त्यासंबंधीचे स्पेशल मटेरियल उत्पादन घ्यायला सुरुवात केली. सुरुवातीला कंपन्यांद्वारे कॉन्ट्रॅक्ट मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मॅन्युफॅक्चरिंगमध्ये नंतर लक्ष घातले .एकदा भावांकडे सोपवलेल्या कंपन्यांच्या कामांमध्ये हस्तक्षेप करायचा नाही आणि त्या कंपन्यांना स्पर्धक म्हणून त्यांचा ग्राहक तोडायचा नाही हे त्यांचे धोरण होते .त्यामुळे नवीन कंपनीसाठी त्यांनी नवीन ग्राहक शोधले. त्यात ते यशस्वी झाले. याच काळात परदेशात आयोजित नानाविध प्रदर्शनांमध्ये दिलेल्या भेटींचा मधुकर ब्राह्मणकर यांना फायदा झाला.

जगाकडे एक नव्या दृष्टीने बघण्याचा दृष्टिकोन विकसित झाला. त्या दृष्टीने त्यांनी आपली उत्पादने वाढवायला सुरुवात केली व आपल्या कंपनीचे उत्पादन जगभर पोहोचण्यासाठी प्रयत्न सुरू केला. २०१० सालाच्या जवळपास त्यांचे सुपुत्र हर्षद आणि चंद्रशेखर या त्यांच्या दोन्ही मुलांनी आपल्या वडिलांना व्यवसायात मदत करायला सुरुवात केली. त्यानंतर मुलांच्या कर्तबगारीने कंपनीने गरुड झेप घेतली. आज त्यांच्या कंपनीचे उत्पादने जगातील ३५ देशांमध्ये निर्यात होत आहेत. मधुकर ब्राह्मणकर यांनी भारत गॅसची लक्ष्मी गॅस सर्विस या नावाने एजन्सी मिळवली. उद्योग म्हटला की उतार चढाव आले .या संपूर्ण उतार चढावात पन्नास वर्ष ते नुसते टिकून राहिले नाहीत तर त्यांनी आपल्या कंपनीचा मोठा विस्तार केला आहे. त्यांचे चारही अपत्य दोन मुले आणि दोन मुली उच्च विद्याविभूषित असून एक मुलगी अमेरिकेत स्थायिक आहे. व दुसरी मुंबईत आहे दोन मुले त्यांच्या व्यवसायात त्यांना मदत करीत असून आता स्वतंत्रपणे त्यांचा व्यवसाय पुढे नेत आहेत. उद्योगधंद्याची कोणतीही पार्श्वभूमी नसताना मधुकर ब्राह्मणकर यांनी आपल्या धडपडीतून मोठा व्यवसाय उभा करून अनेक तरुणांकरता आदर्शवत कार्य केले आहे.

मधुकर ब्राह्मणांकरांचा वैयक्तिक व्यवसायिक कार्याइतकेच त्यांनी समाजासाठी विविध संस्थांच्या माध्यमातून केलेले कार्य अतुलनीय आहे. नासिक इंडस्ट्रीज वेल्फेअर क्लबच्या संचालक पदी मधुकर ब्राह्मणकर यांनी कार्य करताना नाशिक शहरातील उद्योगांच्या विकासासाठी व उद्योजकांसमोरील प्रश्न सोडवण्यासाठी भरीव कार्य केले. नाशिक इंडस्ट्रियल मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन या संघटनेतही त्यांनी दीर्घकाळ सेवा दिली .मधुकर ब्राह्मणकर त्यांनी निमाच्या अध्यक्ष पदी असताना नाशिकच्या औद्योगिक वृद्धीसाठी भरीव कार्य केले. लाडशाखीय वाणी समाज सन्मित्र मंडळ १९८९ साली त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्थापन केले. या मंडळामार्फत घरातील कर्त्या पुरुषाचे निधन झाले असेल तर त्या कुटुंबाला ५० हजाराची आर्थिक मदत दिली गेली तसेच समाजातील गरजू विद्यार्थ्यांकरता शिष्यवृत्ती योजना ,आपत्कालीन मदत योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. मंडळाचे रूपांतर आता फार मोठ्या समाज उपयोगी चळवळीत झालेले आहे.

लायन्स क्लब मध्ये मधुकर ब्राह्मणकरांनी दीर्घकाळ काम केले व अनेक समाज उपयोगी उपक्रम हाती घेतले .लायन्स क्लबचे ते काही काळ अध्यक्ष होते.

कोविड-१९ काळात अनेक घरातील कर्त्या पुरुषांचे निधन झाले. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या मधुकर ब्राह्मणकर यांनी आपले मित्र हेमंत राठी, प्रशांत पाटील यांच्या मदतीने दिव्य चेतना सोशल फाउंडेशन ही कंपनी रजिस्टर केली. त्या कंपनीमार्फत नाशिक जिल्ह्यातील १३५ मुलांची शैक्षणिक जबाबदारी घेण्यात आलेली आहे. त्या विद्यार्थ्यांना पदवीपर्यंत शिक्षणाकरता मदत केली जाते तसेच त्यांच्या आईला नोकरीसाठी किंवा स्वयंरोजगारासाठी मदत दिली जाते.

मधुकर ब्राह्मणकर यांनी वयाचे ७५ वर्ष ओलांडले असले तरी ते अजूनही पूर्ण वेळ कार्यरत आहेत. आपल्या सुविद्य पत्नीची साथ त्यांना आयुष्यभर लाभली .त्यांनी कुटुंबासोबत जगभर भ्रमण केले. त्यांनी आपली प्रकृती उत्तम राखली आहे .उत्तम टेनिस खेळतात. समाजात मिसळतात. आपला व्यवसायाला अजूनही पूर्ण वेळ देऊन, पुढे नेण्याचा प्रयत्न करतात .पुढील काळात ते अधिक जोमाने व्यवसाय वाढवतील यात शंका नाही .मधुकर ब्राह्मणकर या उद्यमशील, समाजशील, कुटुंबप्रिय व्यक्तींमुळे समाजासाठी अनेक क्षेत्रात आदर्श कार्य उभे राहीले आहे .मधुकर ब्राह्मणकर यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा!



शब्द संवाद
प्राचार्य प्रशांत पाटील
(नाशिक) मो.९५११८५९९३९

## मुलींनो आंधळं प्रेम करू नका!


या सर्व पार्श्वभूमीवर आपल्याला अतिशय अल्लड, अर्धवट वयात भेटलेला मुलगा, जो नोकरी-धंद्यात देखील स्थिर नाही, ज्याचं शिक्षण पूर्ण नाही, जो एक रुपया कमवत नाहीये, किंवा सेटल असेल तरी ज्याच्या बाबतीत आपल्याला फारशी इतर माहिती नाहीये, असा मुलगा आयुष्याचा जोडीदार म्हणून का निवडला जातोय? त्याच्यासोबत सगळ्या मर्यादा ओलांडून आपण कसे वाहवत जावू शकतो?

ज्याचे आपल्यावर प्रेम आहे, आपल्याशिवाय जगू शकणार नाही, आपला दुरावा सहन करू शकणार नाही असली वचने, शपथ, वायदे देतोय, मी तुझ्याशी लग्नाला तयार आहे म्हणतोय, मी तुला सोडणार नाही, अशी भावनिक वक्तव्य करतोय आणि त्याचवेळी प्रेमाच्या नावाखाली आपल्याला शारीरिक संबंध ठेवायला भाग पाडतोय. लग्न न करताही आपण एकत्र राहुयात असे पर्याय देतोय? आपल्याला वेळोवेळी भावनिक करून आई-वडिलांचे घर सोडायला प्रवृत्त करतोय, पळून जावून वेगळं राहू, कोर्टात लग्न करू, शून्यातून जग निर्माण करू असले डायलॉग मारतोय तो खरा प्रेमवीर आहे, असं आपल्याला का वाटतं? जो मुलगा आपल्याला शाळा-कॉलेजचे वर्ग बुडवून फिरायला चल म्हणतोय, आपलं शिक्षण सोडायला सांगतोय, घरातल्यांना खोटं सांगून लपून छपून आपल्याला भेट म्हणतोय, स्वतः देखील तेच उद्योग करतोय, जो इकडून तिकडून उधार पैसे मागून आपल्याला गिफ्ट ग्रीटिंग, हॉटेलिंग, लाँग ड्राईव्ह असले प्रकार फक्त इंप्रेस करायला करतोय, तो प्रेम करण्याच्या लायकीचा आहे का? त्याचं भविष्य काय हा प्रश्न आपल्याला पडत नाही का? जो स्वतःची वासना भागवायला आपल्याला कोणत्याही खालच्या दर्जाच्या लॉजवर नेतोय, कोणाच्याही खोलीत नेतोय, निर्जन निर्मनुष्य ठिकाणी नेतोय, तिथे कधीही काहीही चुकीचं घडू शकते, हे माहिती असूनपण आपण सोबत असताना अशी भयंकर रिस्क घेतोय, आड बाजूला, आडोशाला नेऊन अथवा सार्वजनिक ठिकाणी जो आपल्यासोबत शारीरिक अश्लील चाळे करतोय, तो प्रेम करत असतो का? लग्न करण्याच्या आधीच आपल्याकडे शारीरिक सुखाची अपेक्षा करणारा, आपल्याला चुकीचे मार्ग दाखवणारा, त्याच्या मित्रांमध्ये आपल्याबद्दल चर्चा करून आपल्याला बदनाम करणारा, स्वतःच्या मूड आणि गरजेनुसार आपल्याला वापरणारा, वेळी अवेळी आपल्याला कुठेही भेटायला बोलावणारा, कोणत्याही वेळी कुठेही आपल्याला फोन, मेसेज करत राहून अडचणीत आणणारा खरं प्रेम करणारा असेल का? लग्नाआधीच आपल्याला आपले अश्लील फोटो व्हीडिओ, मोबाइलवर पाठवायला सांगून, तसेच विविध वेबसाईटवरील व्हीडिओ, फोटो आपल्याला दाखवून आपल्यासोबत त्याची मजा घेणारा व्हीडिओ कॉलमार्फत आपल्याकडून चुकीचं कृत्य करून घेणारा, निस्सीम प्रेम करतोय असं आपल्याला का वाटतं? चोवीस तासातले एक-दोन अथवा तीन तास जरी तो आपल्यासोबत घालवत असेल, तर उरलेल्या वेळेत तो नेमकं काय करतोय, कुठे असतो, कुठे जातो, कोणासोबत कोणत्या अवस्थेत असतो, व्यसन करतो का? याबद्दल आपल्याला खरी माहिती असते का? त्याच्या घरातील लोकांची, मित्रांची, त्याच्या सगळ्या चांगल्या-वाईट सवयीची, त्याच्या खऱ्या स्वभावाची, त्याच्या गुण-दोषांची आपल्याला काहीही शाश्वत माहिती नसताना फक्त त्याचं वरवरचं बोलणं आपल्याला प्रेम का वाटतं? अशा प्रकारच्या एखादा मुलावर जरी आपण मनापासून प्रेम केलं तरी त्याला त्याची कितपत किंमत आहे? तो आपलं प्रेम शेवटपर्यंत निभावण्याच्या मानसिकतेमधला आहे का? तो स्वतः तेवढा सक्षम आहे का? प्रामाणिक आहे का? तो आयुष्यात कधीही बदलणार नाही याची खात्री आपण कशी आणि कुठून करणार आहोत? असे असंख्य प्रश्न आहेत, जे मुलींनी स्वतःला विचारणे गरजेचे आहे.

स्वतःच्या आई-वडिलांचे हक्काचं घर सोडून, सर्व सुखसोयी, करिअर, चांगलं लग्नाचं स्थळ, चांगला मिळू शकणारा नवरा सोडून कोणत्याही मुलासोबत कुठेही मिळेल तिथे भाड्याने घरं घेऊन राहणं, पुढे दोघांनी मिळेल ती नोकरी-व्यवसाय करून पोट भरणे, जमलंच तर रजिस्टर लग्न करणं अथवा तसंच एकत्र राहणं या संघर्षांमध्ये आपलं खरं म्हणवणारं प्रेम टिकणार आहे का? बाहेरच्या जगातील ठोकरा लागल्यावर, दररोज आव्हान उभी राहिल्यावर, राहणीमान, कपडे खाणे-पिणे याचा दर्जा घसरल्यावर, एकमेकांच्या सवयी खटकू लागल्यावर आपलं स्वप्नातल प्रेम तग धरू शकणार आहे का? हा विचार मुलींनी करावा. आपलं आंधळं प्रेम आपल्याला त्याच्याविरुद्ध कोणतंही कठोर पाऊल उचलू देत नाही, कारवाई करू देत नाही. परत परत चुकीच्या व्यक्तीवर विश्वास ठेऊन आपण किती दूर निघून आलोय याची जाणीव पण आपल्याला होऊ नये का? हे सगळं सहन करत असताना पण आपल्याला जन्मदात्या आई-वडिलांना संपर्क साधावा, त्यांची मदत मागावी. स्वतः शारीरिक, मानसिक, भावनिक नुकसान होऊन पण मुलींना माघारी फिरावसं का वाटत नाही? जो आपला तिरस्कार करू लागला आहे, आपल्याला टाळू लागला आहे, त्याच्यासमोर इतकं लाचार होऊन जगण्याची गरज काय? आपला आत्मसन्मान कुठेच जागा होत नाही का? खोटे बोलून ज्यानं आपल्याला फसवलं, विश्वासघात केला, आपल्या प्रेमाचा गैरफायदा घेतला, ज्याच्या दुष्ट, विकृत, त्रासदायक वागणुकीमुळे आपलं आयुष्य उद्ध्वस्त झालं, ज्याच्या निष्काळजी आणि बेजबाबदार वर्तवणुकीमुळे आपल्याला वाईट दिवस आलेत, त्याच्याच सोबत परत परत राहण्याचा अट्टहास का आणि कशासाठी? ज्याच्यामुळे आई-बाप दुरावले, जवळचे सगळे लांब झाले तरीही असं नातं टिकवण्याची मुलींची धडपड, तो सुधारेल, बदलेल ही दुबळी आशा, आपलं प्रेम, आपली ओढ त्याला बदलायला भाग पाडेल हा मूर्खपणाचा कहर आणि यातूनच एक दिवस जीवनाचा अंत झालेली सुशिक्षित, सुसंस्कृत, चांगल्या घरातील मुलगी हे विदारक सत्य आज समाजात पाहायला मिळते आहे. मुलींनो हे बदला, स्वतःला बदला, स्वतःच्या स्वप्नांना बदला, विचारांना बदला, आपला दृष्टिकोन बदला. आपलं आयुष्य इतकं स्वस्त आणि किरकोळ नक्कीच नाही. कोणत्याही कसायाच्या हातून आपण मरावं यासाठी आपल्याला पालकांनी जन्म दिलेला नाही. आपल्या आई-वडिलांनी आपला असा विदारक अंत पाहावा इतके दुर्दैवी त्यांना बनवू नका. सर्व तरुण मुलींनी स्वतःला हे सर्व प्रश्न विचारा आणि वेळेत स्वतःला सावरा. प्रेमाच्या नावाखाली स्वतःची इज्जत स्वतःचा जीव गमावून बसू नका. **समाप्तः**

**- फॅमिली काऊन्सलिंगः मीनाक्षी जगदाळे**

## शब्दकोडे-१०९



आडवे शब्द

१. डोंगरराजीतील साहसी पर्यटन ४. गुणज्ञ ८. वक्र ११. पानाचे दुकान १२. अफूचे बी १४. महिना १५. पहारेकरी १८. विपुलता २०. हस्तेपरहस्ते २२. जिवलग मैत्रिण २३. निकट २५. रडगाणे, रडकथा २६. अरण्य २८. वृक्ष ३०. होडी चालवणारा ३२. किल्ली ३४. घनिष्ठ संबंध ३६. समुद्राच्या लाटांचा आवाज ३८. दर पंधरा दिवसांनी प्रसिद्ध होणारे नियतकालिक ३९. '-- जनाब ने पुकारा नहीं, क्या म ेरा साथ भी गंवारा नहीं' ४०. मीठ ४१. थोडेसे ४२. जन्मदाता ४३. हेतू, कारण, स्वार्थ ४५. रेती ४६. विष्णुपत्नीचे एक नाव ४८. वर्ष, साल ४९. लिंबूसाखरेचे थंड पेय ५२. अंगावर येणारा काटा ५४. पादत्राण ५५. गहन ५६. स्वर्गाचे दोन पहारेकरी ५८. तापापूर्वीचे अंग मोडून येणे ६०. घास पण गवत नव्हे ६१. एक चतुर्थांश ६२. व्रत, नेम ६४. उदर ६५. जयघोष ६७. अनुमती ६९. सुंभाबरोबर न जळणारा ७१. मोठा जाड अंगरखा ७२. तांब्या-पितळेची भांडी तयार करणारा ७४. '-- ---- म्हणतील हाय, हाय! मी जाता राहील कार्य काय?' (भा.रा.तांबे) ७७. गवंडी ७८. अचेतन शरीर ७९. पार्वतीचे उग्र रूप ८०. वशिला ८१. सोशिकपणा

उभे शब्द

१. आस्था, फिकीर २. तारणारा ३. आयुध ४. मद्य तयार करणारा-विकणारा ५. रुक्ष ६. सेवक ७. लचकत-मुरडत अशी चाल अथवा चालणारी ९. जास्तीतजास्त १०. मच्छर ११. जपून ठेवलेली गोष्ट १३. अखंड १६. मोठे भांडण १७. राममंदिरातील मारुतीचे रूप १९. जीव, प्राण, चैतन्य २०. चलनवलन २१. अति खाण्यामुळे पोटाला बसणारी ओढ २४. उगीच २७. आवर घालणारी वादी २९. शंभर पैशाचे नाणे ३१. प्रवाशांना घेऊन अधांतरी उडणारे ३३. डोंगरातील लांब गुहावजा जागा ३५. खुमारी ३७. उष्णतेमुळे पायाला भेगा पडण्याचा रोग ४१. आकाश ४२. पाण्याचा साठा असलेली जागा ४३. अंतःकरण ४४. हावरटपणा ४७. इंद्रिय ४८. हुक्की, लहर ५०. मजबूत, भक्कम ५१. चरण ५३. राजसुख ५५. डोक्याला झालेली खोल जखम ५६. मनातली आग ५७. स्थानापन्न (होणे) ५९. उत्सवाचे दिवस ६१. चबुतरा ६३. भेग, चीर ६६. अंजन ६८. रविंद्रनाथ टागोरांचा काव्यसंग्रह ७०. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या आपण सगळेच ७१. नाजूक ७३. पत्र ७४. एक गळित धान्य ७५. वारा ७६. यज्ञ ७७. पौर्णिमा

### शब्दकोडे १०८ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.१.पणजोबा ४.धुसफूस ७.हजरजबाबी १२.गळका १४.जनावर १५.कडवा १७.वेतनपत्रक २०.तसा २२.ढाब २३.गट्टी २४.पाचर २६.रतन २८.जकात २९.जरड ३१.साजरा ३८.वादविवाद ४०.करीब ४२.चाट ४३.बंदर ४५.डाल ४६.करडा ४७.तसा ४८.दीर ५०.दाभण ५१.दास ५२.सतार ५४.वाटप कर ५५.खबरदार ५७.रास ५८.सजा ५९.नारद ६०.बाबा ६२.अदबशीर ६४.दीन ६५.पटाशी ६६.दम ६९.रजा ७०.धर्म भीम अर्जुन नकुल सहदेव ७६.मामा ७७.वाट ७८.राग ८०.ताशी ८१.कमान ८२.कारभारी ८३.तळ

**उभे उत्तर**

१.१.पदक २.जोगवा ३.बाळ ५.सज्जनगड ६.सर्वत्र ७.हज ८.जनाधार ९.रव १०.जरतर ११.बीन १३.कावेबाज १६.डरकाळी १८.पट्टी १९.कपाळ २१.सात बाराचा उतारा २५.चकाचक २७.नग २८.जमावबंदी ३०.रखवालदार ३१.पुणेकर ३२.कसाबसा ३५.साद ३८.वार ३९.विडा ४१.रीतसर ४४.दरवाजा ४६.कणखर ४९.आसमान ५१.दादादादी ५३.रसरशीत ५६.बदक ५८.सरोद ५९.नार ६१.बापजादे ६३.बदाम ६७.मधमाशी ६८.धनवान ६९.रहदारी ७१.भीषण ७२.अथक ७३.नट ७४.लकेर ७५.वरात ७६.माता ७९.गळ

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# रेड क्रॉस, सह्याद्री हॉस्पिटलतर्फे डॉक्टर्स डे सन्मान सोहळ्यात सेवाव्रती डॉक्टरांचा सत्कार




**नाशिक । प्रतिनिधी**

इंडियन रेड क्रॉस सोसायटी, नाशिक जिल्हा शाखा आणि सह्याद्री हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने डॉक्टर्स डे निमित्त गौरव सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी विविध वैद्यकीय संघटनांचे पदाधिकारी आणि विशेष कामगिरी बजावलेल्या ७५ हून अधिक डॉक्टरांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला.

प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ. विजयालक्ष्मी गणोरकर आणि जयप्रकाश जातेगावकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रेड क्रॉस चेअरमन डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी होते. तर व्यासपीठावर सह्याद्री हॉस्पिटलचे हृदयरोग तज्ञ डॉ. राहुल कैचे, न्युरोसर्जन डॉ.समीर फुटाणे, सचिव डॉ.सुनील औंधकर, मेजर पी.एम.भगत, डॉ.प्रशांत भुतडा, डॉ. प्रतिभा औंधकर, प्रतिभा भगत उपस्थित होते.

आरोग्य सेवा जनमानसापर्यंत प्रभावी पद्धतीने पोहोचावी यासाठी रेडक्रॉस सारख्या सेवाभावी संस्था आणि नाशिक मधील प्रस्थापित रुग्णालये यांनी एकत्रित येऊन काम करणे ही काळाची गरज आहे असे मत यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी व्यक्त केले. डॉ.धर्माधिकारी यांनी डॉ. बी.सी. रॉय यांचा स्फूर्तीदायी जीवनपट उघडवून दाखवला.

मार्केटिंग व्यवस्थापक चेतन जोशी यांनी सह्याद्री हॉस्पिटल मधील विविध नव्या सुविधा आणि योजनांची माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. उत्पल राणे आणि डॉ.सुचिता गंधे यांनी केले. कार्यक्रम यशस्वितेसाठी अनुप शेट्टीवार, चंद्रकांत गोसावी, मंगला कस्तुरे, जयश्री कुलथे, मंगल रत्नाकर, सारिका गुप्ते प्रयत्नशील होते.

# त्रिमूर्ती नगर मध्ये अवतरले पंढरपूर वारीची अनुभूती : शेकडो भाविकांचा सहभाग

**नाशिक । प्रतिनिधी**



पंचवटीतील नवीन आडगाव नाका येथील त्रिमुर्ती नगर येथे आषाढीनिमित्त परिसरातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर रात्री घेण्यांत आलेल्या भजन संध्येत शेकडो भाविकांनी सहभाग घेतला. त्यामुळे त्रिमूर्ती नगर मध्ये पंढरपूर अवतरले असल्याचा भास दिसून येत आला.

त्रिमुर्ती नगर भजनी मंडळ, महीला मंडळातर्फे गेल्या १५ वर्षापासून आषाढी एकादशीनिमित्त पालखी मिरवणूक, भजन संध्या घेण्यात आली. त्रिमूर्ती नगर येथे विठू रायाच्या प्रतिमेचे कीर्तनकार फौजी महाराज सुर्यवंशी, पोपट मराठे , सोपान देवकर, छोटू मराठे, एकनाथ सांगळे, बापू गुढे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर त्रिमूर्ती नगर येथून निघालेली पालखी हिरावाडी, विजय नगर कॉलनी मार्गे पुन्हा त्रिमूर्ती नगर येथे पालखी सोहळ्याचा समारोप झाला. पालखी दरम्यान स्व. त्र्यंबकराव पाटील यांच्या परिवारा तर्फे खिचडी वाटप, ज्ञानेश्वर देव्हडराव यांच्या तर्फे चहा वाटप करण्यात आले. ठीक ठिकाणी पालखीचे पूजन करण्यात आले. महिलांनी पालखी मार्गात आकर्षक रांगोळी काढली होती. रात्री उशिरा पर्यंत सुरू असलेल्या भजन सोहळ्यात भाविकांनी सहभाग घेतला.यावेळी विजय वाबळे, पिंटू गूढे, मुसळे , मुक्ता वाबळे,गीता मराठे, कवी मराठे, नयन सुर्यवंशी यांच्यासह भाविक उपस्थित होते.

# श्री सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनतर्फे उद्या गुरूपौर्णिमा उत्सव

### विद्यार्थी गुणगौरव सोहळा: डॉ. गुट्टे महाराज लिखीत 'जीवनसार सूत्र'पुस्तकाचे प्रकाशन

**नाशिक । प्रतिनिधी**



सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनतर्फे दरवर्षीप्रमाणे यावर्षी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त ३ जुलै रोजी सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनच्यावतीने छत्रपती संभाजीनगर मार्गावरील साई लिला लॉन्स येथे होणाऱ्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी गुणगौरव, गुरुपूजन व डॉ. तुळशीराम महाराज लिखीत 'जीवनसार सूत्र' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी संत साहित्याचे अभ्यासक डॉ. तुळशीराम महाराज गुट्टे यांचे प्रवचन होणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे पद्मश्री दादा इदाते, खासदार उन्मेष पाटील, खासदार हेमंत गोडसे, आ. राहुल ढिकले, आ.सीमा हिरे ,ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, आ. नरेंद्र दराडे, माजी आ. बाळासाहेब सानप, दिनकर पाटील, अशोक मुतर्डक, गणेश गीते यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. इयत्ता १० वीच्या पुढील अभ्यासक्रमातील ८० टक्के व त्यापेक्षा जादा गुण असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव होणार आहे. सोहळ्यात महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश मधून देखील भाविक सहभागी होणार आहेत. ११वर्षापासून नाशिकमध्ये हा भव्य सोहळा साजरा होत आहे. यावेळी भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुपौर्णिमा उत्सव यशस्वी होण्यासाठी सचिव सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे सचिव शाम पिंपरकर, सुनील केदार, संजीव अहिरे, विजय सोनवणे, सोमनाथ बोडके, गणपत हाडपे, अनिल सांगळे, प्रणित सानप, विनायक सांगळे, दिलीप अहिरे आदींसह सर्व पदाधिकारी, भक्त मंडळ प्रयत्नशील आहेत.

# रंगसाहित्याच्या संगतीने वाढली वाढदिवसाची रंगत

**नाशिक ।** छान छान चित्र काढणे व सुंदर रंगांनी रंगवणे सर्व बालकांना आवडते. निरागस, निराधार बालकांच्या जीवनात सप्तरंग भरावे या उद्देशाने त्यांना रंगसाहित्याची भेट देण्यात आली. ज्येष्ठ पत्रकार व वारली चित्रशैली अभ्यासक संजय देवधर यांनी रंगसाहित्य देऊन छोट्यांच्या वाढदिवसाची रंगत वाढवली. आधाराश्रम ही संस्था गेली ७० वर्षे निराधार, पोरक्या मुलांचा सांभाळ करण्याचे काम करते. अशोकस्तंभाजवळ घारपुरे घाट परिसरात असलेल्या वास्तूत दरमहा येथील मुलांचे वाढदिवस साजरे केले जातात. काल जून महिन्यातील मुला-मुलींचे वाढदिवस उत्साहात साजरे झाले. यावेळी रंगसाहित्य देऊन रंगत वाढवण्यात आली. त्यात रंगीत खडू, अनेकरंगी पेन्सिली, जलरंग, पोस्टर कलर्स, ब्रशेस, स्केचपेन्स व इतर साहित्याचा समावेश आहे. मुलांच्या कला कौशल्याला वाव मिळायला मदत होईल. यापूर्वी विविध आदिवासी पाड्यांवर देखील असे साहित्य देण्यात आले होते. साई, श्लोक,अनिता, लक्ष्मी, प्रणाली, पिंकी, स्वामिनी, वृषाली यांना औक्षण करून केक कापण्यात आला. गाणी व नाच याचा आनंद सर्वांनी लुटला. रघुनाथ व शोभा लोटे आणि नलिनी मंगत परिवाराने केक, खाऊ दिला. कार्यक्रमाला आधाराश्रमाचे सचिव हेमंत पाठक, सुनिता परांजपे, समन्व्ययक राहुल जाधव व कर्मचारी उपस्थित होते.

# गुरुपौर्णिमा उत्सव यंदा दक्षिणमुखी हनुमान मंदिरात

**नाशिक । प्रतिनिधी**

वारकरी महामंडळ नाशिक अध्यक्ष- हभपश्री आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांचा गुरुपौर्णिमा उत्सव राहते घराजवळ सातमाऊली मंदिरोडचे पुढे दक्षिणमुखी हनुमान मंदिर, श्रमिकनगर सातपूर नाशिक येथे सोमवार दि. ३ जुलै रोजी सकाळी ११ ते २ पर्यंत संपन्न होणार आहे, हभपश्री महंत सुभाष महाराज जाधव गणेशपूरकर यांचे सकाळी १०.३० ते १२.३० पर्यंत गुरुमहात्म्य या विषयावर किर्तन होईल.

कार्यक्रमास खासदार हेमंत गोडसे, महेश हिरे, आमदार सिमाताई हिरे, माजी आमदार अपुर्व हिरे, सातपूर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंकज भालेराव, उपनगर पोलिस स्टेशनचे पोलिस अधिकारी सतिष घोटेकर, दै.गांवकरीचे नानासाहेब उदावंत, लक्ष महाराष्ट्रचे दिलीप साळुंके, दै.आवाजचे भाऊसाहेब हुजबंड नानगरसेवक दिनकर पाटील, महापौर दशरथ पाटील, करण गायकर, नंदु शेठ जाधव, वास्तुविशारद अरुण घुगे, सप्तश्रृगी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष बाबुराव भोर सलिम शेख, इंदुबाई नागरे, हेमलता कांडेकर, वर्षा भालेराव, शशिकांत जाधव, दिक्षा लोंढे, रविंद्र धिवरे, योगेश शेवरे, माधुरी बोरकर, सिमाताई निगळ, विक्रम नागरे, अशोक पारखे, परशराम शिंदे, देवा जाधव, समाधान देवरे, रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष हभप निवृत्ती महाराज कापसे, वारकरी महामंडळ जिल्हासंपर्कप्रमुख हभप त्र्यंबक भंदुरे, जिल्हा संपर्कप्रमुख हभपश्री साहेबराव महाराज अनवट कालवीकर, जिल्हासचिव हभप लहुजी महाराज अहिरे, सप्तश्रृंगी जेष्ट नागरिक संघ अध्यक्ष किसनराव खताळे, जनविकासचे बाळासाहेब जाधव, सातपूर वारकरी महामंडळ अध्यक्ष हभप सुनिल महाराज निघोट, महिला वारकरी अध्यक्ष हभप सुमनताई शिंदे आदी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत, याची सर्व वारकरी साधक भाविकांनी नोंद घ्यावी असे गुरुपौर्णिमा उत्सव समितीचे अध्यक्ष हभप कैलास महाराज घुगे व निमंत्रक हभप धनंजय महाराज रहाणे यांनी कळविले आहे.

# भोर परिवाराचे वात्सल्य हरपले : आण्णासाहेब आहेर



**नाशिक ।** आई म्हणजे दुधावरची साय,गोठ्यातली गाय,घरातली माय,शास्त्रामध्ये गीता,रामायणात सिता तशी घरात माता श्रेष्ठ आहे. भोर परिवाराचा आधारवड, जुने पिढीचा वटवृक्ष सर्वावर प्रेम करणार वात्सल्य हरपले असे भावोद्गार वारकरी महामंडळ नाशिक अध्यक्ष आण्णासाहेब महाराज आहेर हिसवळकर यांनी चांदोरी येथे वै. अनुसयाबाई खंडेराव भोर यांना श्रद्धांजली वाहतांना व्यक्त केले. भाजपाचे सामाजिक नेते महेशजी हिरे, नाशिक पच्छिमच्या आमदार सिमाताई हिरे यांनीही तिव्र शोक व्यक्त केला आहे,यावेळी नगरसेवक नंदुशेठ जाधव, शिवसेनेचे महानगरप्रमुख दिपक मौले, वास्तूविशारद अरुण घुगे,अशोक बच्छाव, माणिकराव निकम,किशोर जाधव भगवान रायते,बापू देवरे,म्हस्के क्लासचे संचालक कारभारी म्हस्के,भाऊसाहेब महाडीक, निवृत्ती खैरे, चांदोरीचे निवृत्ती बुवा पा.भोर, मखमलाबादचे राजेंद्र फडोळ आदी उपस्थीत होते. त्यांचे पाठीमागे चांदोरीचे शिवाजी भोर व अशोकनगर सप्तश्रृंगीदेवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष व जय अंबिका उद्योगचे संचालक बाबुराव भोर ही दोन मुले, दोन मुली असा मोठा परिवार आहे.


## CHANGE NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM
BHARAT BABURAO SONAWANE
TO
BHARAT BABURAO SONAVANE
**ADDRESS -** AT POST VADALI THA
SHAHADA NEAR VIDYA MANDIR
WARD NO 3 VADALI NANDURBAR
MAHARASHTRA 425423



## जाहिर नोटीस

**साक्री येथिल मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर यांचे कोर्टात**

**दि. कि. अ. नं. ४०/२०२३**

श्री. रमेश राजाराम महाले उ. व. ४८ धंदा. शेती रा. बळसाणे, ता. साक्री, जि. धुळे ह.मु. सुरत, ता. जि. सुरत ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही ... सामनेवाला**

जाहीर पेपर नोटीस परवानगी अर्ज

सदर अर्जदार मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते येणेप्रमाणे,

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (VIII) बॉम्बे १८२७ अन्वये वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी मे. दिवाणी न्यायालयात क स्तर कोर्टात दाखल केला आहे कारणे जाहिर नोटीस देण्यात येते की यमुना उर्फ गंगाबेन राजाराम महाले यांचे दि.२०/०८/२०१५ रोजी सुरत, ता. जि. सुरत येथे निधन झाले मयताला मुत्युसमयी खालीलप्रमाणे वारस होते

१) श्री. रमेश राजाराम महाले - मुलगा, २) श्रीमती. लताबाई इंदास कुवर-मुलगी, ३) श्रीमती. शानुबाई प्रभाकर शिंदे-मुलगी ४) श्रीमती. उजैन बंडु महाले - सुन

मयताला वरीलप्रमाणे वारस असुन यांच्याशिवाय दुसरा कोणीही वारस नाही विविध प्रकारच्या सरकारी (शासकीय), निमसरकारी ( निमशासकीय ) व महसुली कामांसाठी दाखला आवश्यक असल्याने वरील वारसव्यतिरीक्त वारस हक्का असल्यास सदर जाहिर नोटीस काढण्यात आली आहे.

त्याअर्थी या जाहिर नोटीसीदवारे कळविण्यात येते की वरील वारसा व्यतीरीक्त कोणाचा काहीही हक्क व अधीकार असल्यास त्यांनी साक्री येथील मा. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांच्या न्यायालयात दि. ०५/०८/२०२३ रोजी स्वत अगर वकीलामार्फत हजर राहावे वरीलप्रमाणे करण्यास चुकल्यात तर आपल्या या अर्जाच्याकामी कोणत्याही प्रकारचे काहीएक हरकत नाही असे समजुन योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाच्या सही शिक्यानिशी प्रसीध्दीत दिली आहे.

स्थळ- साक्री
दि.३०/०६/२०२३

(शिक्का)

**कामगिरी लिपीक** — **दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री**
**सहा. अधिक्षक** — **दिवाणी न्यायलय क.स्तर साक्री**



**ॲड.**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे.९ वे सह दिवाणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात**

**दि.कि. अर्ज नं. ६९९/२०२३**

१) श्री. संजय रामकृष्ण गायकवाड
रा. प्लॉट नं. १२, मार्केट यार्ड, रामनगर जवळ ........**अर्जदार**

**विरुध्द**

१) श्री. विजय रामकृष्ण गायकवाड
२) श्री. अजय रामकृष्ण गायकवाड
३) श्री. सनी ऊर्फ राजेश रामकृष्ण गायकवाड
४) उज्वला रामकृष्ण गायकवाड
५) माधुरी रामकृष्ण गायकवाड
६) करीष्मा रामकृष्ण गायकवाड
सर्व रा. प्लॉट नं. १२, मार्केट यार्ड, रामनगर जवळ....**सामनेवाले**
कै. रामकृष्ण हरी गायकवाड ........**मयत**

**कायदेरि वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी**
(Legi Hirship Grtificate)

ज्याअर्थि अर्जदार व सामनेवाले नं. १ ते ६ यांचे यांचे वडील कै. रामकृष्ण हरी गायकवाड याचा मृत्यु दि. २४/०८/२०२० रोजी धुळे ता. जि. धुळे येथे झालेला असुन त्याचे नावे असलेली बोलारे पीकअप वाहन क्र. MH-18 AZ- 5009 या वाहनासाठी अर्जदार श्री. संजय रामकृष्ण गायकवाड यांनी त्याचे अग्रहक्क वारस म्हणुन वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज या मे.न्यायालयात दाखल केलेला आहे.

ज्याअर्थि, या जाहीर नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जावर कोणाचे काही म्हणणे असेल तर त्यांनी दि. १७/०८/२०२३ या नेमलेल्या तारखेस सकाळी ११.०० वाजता या मे.न्यायालयात स्वत्: अगर प्रतिनिधी अथवा वकील यांचे मार्फत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह हजर रहावे. अन्यथा, कुणाची काहीही या अर्जावर हरकत नाही व त्यांना या अर्जावर काहीही म्हणावयाचे नाही असे समजुन सदर कामी पुढील कामकाज चालवीले जाईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस दि. २७/०६/२०२३ सहिक्कानिशी दिली.

(शिक्का) आदेशावरुन

**बेंच क्लर्क** — **फौजदारी न्यायालय,धुळे**
**सहायक अधिक्षक** — **फौजदारी न्यायालय,धुळे**



## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. चिफ ज्युडि. मॅजि. साहेब यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ४७६/२०२३**

नंदलाल शिवदास पगारे ........**अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत विंचुर, धुळे ....**सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचा आजी मयत शांताबाई खंडु पगारे यांचा दिनांक दि.१५/०६/१९८१ रोजी विंचुर येथे मयत झाले आहे त्यांचा अंत्यसंस्कार देवपूर धुळे येथे करण्यात आला आहे. परंतु, त्यांचा मृत्यूदाखला सामनेवाला यांनी न दिल्यामुळे अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंद अधिनीयम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूदाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग - १ कोर्ट नं.९ धुळे यांचेकडे फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४७६/२०२३ हा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी वर नमूद अर्जाबाबत जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचे कामी दि.१०/८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास धुळे येथील मे. ज्युडी. मंजि. वर्ग-१ कोर्ट नं. धुळे येथे व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने / हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :-धुळे
दिनांक :- ३०/६/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकून** — **९ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**
**सहायक अधिक्षक** — **९ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**



## जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. चिफ ज्युडि. मॅजि. साहेब यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ४७५/२०२३**

नंदलाल शिवदास पगारे ........**अर्जदार**

**विरुध्द**

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत विंचुर, धुळे ....**सामनेवाला**

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचा आजोबा मयत खंडु तुकाराम पगारे यांचा दिनांक दि.१५/०६/१९८१ रोजी विंचुर येथे मयत झाले आहे त्यांचा अंत्यसंस्कार देवपूर धुळे येथे करण्यात आला आहे. परंतु, त्यांचा मृत्यूदाखला सामनेवाला यांनी न दिल्यामुळे अर्जदार यांनी जन्म मृत्यु नोंद अधिनीयम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे मृत्यूदाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग - १ कोर्ट नं.८ धुळे यांचेकडे फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४७५/२०२३ हा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी वर नमूद अर्जाबाबत जर कोणत्याही व्यक्तीस काहीही हरकत असेल तर त्यांनी वर नमुद केसचे कामी दि. ४/८/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजेच्या सुमारास धुळे येथील मे. ज्युडी. मॅजि. वर्ग-९ कोर्ट नं.. ८. धुळे येथे व्यक्तीशः व आपल्या वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणने / हरकत नोंदवावी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ३०/६/२०२३

(शिक्का)

**कामगिरी कारकून** — **८ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**
**सहायक अधिक्षक** — **८ वे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग धुळे**



**ॲड.संतोष बी. बोरसे**
**निशाणी नं.६**

## जाहिर नोटीस

**धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दि.कि. अर्ज नं. ६४३/२०२३**

फरिदा कैजर मद्रासवाला वगैरे ........**अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही**

(कै. रुकैया बी. सैफोद्दिन - मयत) ........**जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे न्यायालयात दि.९/६/२०२३ रोजी दि. कि. अर्ज नं. ६४३/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार यांनी कै. रूकैया बी. सैफोद्दिन यांचा वारस दाखला मिळणेकरीता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ. दि.२१/०७/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर कोर्ट नं. ७ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण-धुळे
दिनांक :- १७/०६/२०२३ आदेशावरुन

(शिक्का)

**कामगिरी कारकुन** — **मे.दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**
**सहायक अधिक्षक** — **मे. दिवाणी न्यायालय सो. कोर्ट नं.**

## न्यूज कॉलम

### नूतन विद्यालयात विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**दोंडाईचा ।** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षा तथा संसद रत्न खासदार सुप्रिया सुळे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नूतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गरज विद्यार्थ्यांना शालेय दप्तर वह्यांचे वाटप करण्यात आले.माजी मंत्री डॉ हेमंतराव देशमुख आणि उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शालेय दप्तर आणि १००० वह्यांचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ बी बी पाटील , ए जी पाटील, पर्यवेक्षक बी एच पाटील सी एस पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### श्री कैलाश धाम मंदिरात विविध कार्यक्रम

**धुळे ।** शिकुमारनगरात पुज्य बहावलपुरी भवनजवळ असलेल्या श्री कैलाश धाम मंदिरात नवीन घंटा, त्रिशुल व नामकरण बोर्ड लावण्याचे काम पुर्णत्वास आले आहे. यानिमित्त आज सकाळी ९ वाजता त्रिशुल व घंटा पूजन केले जाणार आहे. रात्री ९ वाजता छमाछम झुलेलाल भजनी मंडळाचा भजन संध्या कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भाविकांनी कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# मद्य तस्करी किंग दिनू डॉनला ६ महिन्यानंतर परभणीतून बेड्या

**धुळे । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपूर्वी धुळे तालुका पोलिसांनी केलेल्या अवैध दारू वाहतुक कारवाई दरम्यान फरार आरोपीच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. धुळे तालुका पोलिसांनी मोठ्या शिताफीने परभणी आरोपीला पकडले आहे.धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या अंतर्गत गेल्या काही महिन्यांपूर्वी अवैध दारूविरोधी कारवाई करण्यात आली होती. या कारवाई दरम्यान जवळपास दहा आरोपी निष्पन्न झाले होते. यानंतर नऊ आरोपींचा धुळे तालुका पोलिसांनी तपास करीत त्यांच्यावर गुन्हे दाखल केले होते. परंतु यातील मुख्य आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला होता. तो वेगवेगळ्या राज्यांमध्ये आपल्या मोबाईलचे सिम व मोबाईल वेळोवेळी बदलून पोलिसांना चकवा देत होता.

पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना ४ डिसेंबर २०२२ रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, ट्रक क्र.एमएच ४१/एयु २१२४ हा ट्रकमधून अवैध दारुची वाहतूक केली जात आहे. त्यानुसार पीआय शिंदे यांनी आपल्या पथकासह ट्रकवर कारवाई करुन ९५ लाख ७७ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल व बनावट दारु तयार करण्याची साधने जप्त केली होती. याबाबत तालुका पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच सदर गुन्ह्यात सुमारे १० आरोपीतांचा सहभाग असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झालेले होते. त्यापैकी ९ आरोपींवर कायदेशीर कारवाई करण्यात आली होती. तर मुख्य आरोपी दिनेश निंबा गायकवाड ऊर्फ दिनू डॉन, रा. शिरुड, ता. जि. धुळे हा गुन्हा घडल्यापासुन फरार होता. पीआय दत्तात्रय शिंदे यांनी त्यांचे तांत्रिक कौशल्य व गोपनीयन माहितीचा वापर करुन धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या तपास पथकाला वेळोवेळी तांत्रिक माहिती देवून मुख्य आरोपी दिनू डॉन याचा शोध सुरु ठेवला होता. मात्र, दिनू डॉन हा सतत मोबाईलचे सीमकार्ड व मोबाईल बदलत असल्याने आणि त्याचे लोकेशन नेपाळ, गोवा, उत्तरप्रदेश व बिहार असे दिसायचे. त्यामुळे तो मिळुन येत नव्हता. तेव्हा पीआय दत्तात्रय शिंदे यांना तांत्रिक तपासाच्या आधारे दिनू डॉन हा दि. २८ जून रोजी गंगाखेड, जि. परभणी येथे असल्याचे समजले. त्यानुसार त्यांनी पथकासह कारवाई करत गंगाखेड शहरातील बस स्टॅन्ड जवळील जगदंबा हॉटेल जवळ जि. परभणी येथून काल त्यास ताब्यात घेतले व त्याला धुळे तालुका पोलीस स्टेशनला आणून अटक केली.

दरम्यान, दिनू डॉन याच्यावर राज्यातील अनेक पोलिस ठाण्यांमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्याच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता तालुका पोलिसांनी व्यक्त केली. सदर कारवाही जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, धुळे ग्रामिण विभाग साक्रीचे उप विभागीय पोलीस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, उप निरीक्षक अनिल सुभाष महाजन, पोहेकॉ प्रविण सदाशिव पाटील, पोना उमेश पवार, पोना कुणाल पानपाटील यांच्या पथकाने केली. या कामगिरीबद्दल वरिष्ठ पोलीस अधिकार्यांनी तालुका पोलिसांचे कौतुक केले.



### खात्रीलायक माहितीवरून रचला सापळा

**दोन दिवसांपूर्वी सदर आरोपी हा परभणी येथे असल्याची खात्रीलायक सूत्रांकडून माहिती मिळाल्यानंतर धुळे तालुका पोलिसांनी परभणी येथून या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. या आरोपीला धुळे तालुका पोलीस ठाण्यात आणून त्यावर पुढील कारवाई करण्यात येत आहे. आरोपी विरोधामध्ये विविध जिल्ह्यांमध्ये विविध गंभीर गुन्हे दाखल असल्याची देखील माहिती असून इतर गुन्ह्यांमध्ये देखील हा आरोपी फरार असल्याचे उघडकीस आल्याने या संदर्भातील संपूर्ण तपास धुळे तालुका पोलीस करीत आहेत.**

# जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेची निवडणूक दोन जुलैलाच

### खा.गोडसे यांच्या शिष्टाईला यश

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेची निवडणूक ठरल्या दिवशी म्हणजेच रविवार दि. २ जुलै रोजीच व्हावी यासाठी शासन दरबारी खा. हेमंत गोडसे यांच्या शिष्टाईला यश आले आहे. दोन जुलै रोजीची मतदार प्रक्रिया विषयी रद्द केलेला निर्णय मागे घेतला असून बँकेची निवडणूक ठरल्या दिवशीच घेण्याचा आदेश काल शासनाने पारित केला आहे. खा. गोडसे यांच्या शिष्टाईला यश आल्याने सहकार आणि समता या दोन्ही पॅनलच्या समर्थकांमध्ये आंनदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँकेचे जिल्ह्यामध्ये हजारोंच्या संख्येने मतदार आहेत. जिल्हा परिषद आणि इतर शासकीय विभागांतील अधिकारी आणि कर्मचारी या बँकेचे सभासद आहेत. शासनाने बँकेची निवडणूक दोन जुलै रोजी होणार असल्याचे यापूर्वी जाहीर केलेले होते. दोन्ही पॅनलच्या उमेदवारांनी अवघा जिल्हा पिंजून काढत प्रचार केला होता. परंतु वाढता पाऊस आणि त्यामुळे शेतकरी मतदानापासून वंचित राहू शकतो असे कारण देत सहकार विभागाने दोन दिवसांपूर्वी दोन जुलै रोजी होणारी मतदान प्रक्रिया रद्द केली होती. यामुळे निवडणूकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवार, त्यांच्या समर्थकांनी खा.गोडसे यांच्याकडे धाव घेत ठरल्या दिवशीच निवडणूक होण्यासाठी शासनाकडे शिष्टाई करण्याची आग्रही मागणी केली होती.

उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांची मागणी न्यायिक असल्याने खा.गोडसे यांनी गुरुवारी सहकार मंत्री अतुल सावे आणि विभागाचे सेक्रेटरी राजेशकुमार यांच्याशी संपर्क साधला होता. निवडणूक असलेल्या बँकेचे शेतकरी मतदार नाहीत. त्यामुळे निवडणूक पुढे न ढकलता ठरवल्याप्रमाणे दोन जूलै रोजीच घेण्यात यावी असे साकडे खा.गोडसे यांनी ना. सावे यांना घातले होते. खा.गोडसे यांनी निवडणूक वेळेवरच होणे किती आणि कसे गरजेचे आहे याचे महत्व ना. सावे यांच्या लक्षात आणून दिले. मागणीवर सकारात्मक निर्णय घेणार असल्याची ग्वाही खा.गोडसे यांना दिली होती. यावरच न थांबता खा.गोडसे यांनी काल काही उमेदवारांना मुंबईत पाठवत पुन्हा ना.सावे यांच्याशी संपर्क साधत ठरल्याप्रमाणे निवडणूक रविवार दि. २ जुलै रोजीच होण्यासाठी आदेश काढण्याची विनंती केली. खा.गोडसे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे निवडणूक पुढे ढकण्याचा आदेश शासनाने रद्द करत निवडणूक ठरल्याप्रमाणे दोन जुलै रोजीच घेण्यात यावे असा आदेश काल काढला आहे. दोन जुलै रोजीची मतदार प्रक्रिया विषयी रद्द केलेला निर्णय मागे घेतला असून बँकेची निवडणूक ठरल्या दिवशीच घेण्याचा आदेश काल शासनाने पारित केला आहे. खा. गोडसे यांच्या शिष्टाईला यश आल्याने सहकार आणि समता या दोन्ही पॅनलच्या समर्थकांमध्ये आंनदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डॉक्टरांचे अथक प्रयत्न, जगण्याच्या दुर्दम्य इच्छाशक्तीमुळे युवकास नवजीवन

### रंगपंचमीच्या दिवशी युवकाच्या अंगावरून गेला होता ट्रक

**नाशिक । प्रतिनिधी**

गेली रंगपंचमी नाशिकच्या एका १८ वर्षीय तरुणास आयुष्यभर आठवत राहील. कारण त्याच दिवशी रंग खेळताना झालेला एक अपघात त्यानंतर नाशिकच्या सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील तत्पर सेवा, अनेक स्पेशालिस्ट डॉक्टरांचे अथक प्रयत्न आणि त्या युवकाची प्रबळ इच्छशक्ती यामुळे आज रुग्ण नियमित आयुष्य जगत आहेत

याबाबत माहिती अशी की, १३ मार्च २०२३ रोजी रंगपचमीला ही घटना घडली तेव्हां कुटुंब नाशिक शहरात रंगांच्या सणाचा आनंद घेत होते. आनंदी वातावरणात, एक ट्रक त्या युवकाच्या अंगावरून गेला. त्या १८ वर्षीय तरुणास अत्यंत गंभीर अवस्थेत तात्काळ वैद्यकीय मदतीची नितांत गरज होती. सुट्टीचा दिवस असून देखील सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये, वैद्यकीय पथक, अगोदरच सतर्कतेने, गंभीर जखमी रुग्णाच्यावर उपचार करण्यासाठी तत्पर होते. एक सुसंघटित प्रयत्नांमुळे हॉस्पिटलच्या आपत्कालीन विभागात तज्ज्ञांची एक बहु विद्याशाखीय टीम तयार होती. डॉ. जी.बी.सिंग (जनरल आणि लॅप्रोस्कोपिक सर्जन) यांच्या देखरेखीखाली रुग्णाला ईएमएसमध्ये दाखल करण्यात आले.

सर्व डॉक्टरांनी आणि टीमने त्या गंभीर क्षणी नि:स्वार्थीपणा सेवा आणि कौशल्य प्रदान केले ते खरोखरच प्रशंसनीय होते.

रुग्ण अतिदक्षता विभागात होता, त्याला तज्ञाकडून फिजिओथेरपी आणि आहार मार्गदर्शन यांसारखे विशेष उपचार मिळत होते आणि चोवीस तास हेल्थकेअर प्रोफेशनल्सच्या समर्पित टीमकडून देखरेख, आव्हानात्मक अशा ४५ दिवसांच्या कालावधीत, रुग्णाने अविश्वसनीय दृढ निश्चयाचे प्रदर्शन केले, अनेकदा त्यांच्या दृढनिश्चयाने आणि सकारात्मक वृत्तीने उपचारांना गती मिळाली. अनेक आठवड्यांच्या गहन उपचारानंतर, रुग्णाच्या स्थितीत लक्षणीय सुधारणा झाली, अगदी आशावादी अंदाजांनाही मागे टाकले. अभिमान आणि आनंदाच्या भावनेने भरलेले सर्व डॉक्टर आणि स्टाफ यांनी रुग्णाला एकत्रितपणे रुग्णांस निरोप दिला .

# क्रेडाई क्रिकेट प्रिमिअर लीगमध्ये बागड प्रॉपर्टीज विजेता

**नाशिक । प्रतिनिधी**

शहरातील बांधकाम उद्योगात अग्रणी व क्रेडाई नाशिक मेट्रोचे सभासद असणाऱ्या विविध बांधकाम व्यावसायिकांच्या क्रिकेट प्रमिअर लीगमध्ये बागड प्रॉपर्टीजने विजेतेपद पटकावले. तर श्री हरी कृष्णा डेव्हलपर्सला उपविजेतेपद मिळाले. तसेच द एव्हेन्यू बिल्डर्स अँड डेव्हलपर्सला तृतीय स्थानावर समाधान मानावे लागले.

गंगापूर रोडवरील विश्वास टर्फवर या स्पर्धा रंगल्या. या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता. आपापसात चांगले बाँडींग होण्यासाठी तसेच नित्य कामातून थोडा विरगुळा मिळावा यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील यांनी सांगितले. यात सहभागी १६ संघांपैकी प्रत्येकी ८ संघ २ गटात विभागले गेले होते.



गट व सहभागी संघ असे -

गट १ - ठक्कर डेव्हलपर्स लि., साईराज बिल्डर्स अँड डेव्हलपर्स, श्री जी लाईफ स्पेस , ग्रीन स्पेसे रिअल्टर्स, संकलेचा कन्ट्रक्शन्स प्रा. लि., सुयोजित इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., बागड प्रॉपर्टीज, श्री हरी कृष्णा डेव्हलपर्स

गट २ - सम्राट ग्रुप , एबीएच डेव्हलपर्स प्रा.लि., हरी ओम ग्रुप, सुप्रीम फॉरचून डेव्हलपर्स एल एल पी , हर्षल हणमंते बिल्डर्स अँड डेव्हलपर्स प्रा.लि., पार्क साईड कन्ट्रक्शन्स लि., अर्चित गृप, द एव्हेन्यू बिल्डर्स अँड डेव्हलपर्स.

क्रिकेट लीगचे उद्घाटन सकाळी संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष विनोद शहा व सचिव समीर रकटे, क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील, मानद सचिव गौरव ठक्कर, कोषाध्यक्ष हितेश पोतदार हे मान्यवर उपस्थित होते.

त्यानंतर स्पर्धेचा थरार रंगला. चौकार व षटकार यांची बरसात तर होत होतीच सोबतीला भेदक गोलंदाजी व चित्त थरारक क्षेत्र रक्षण यामुळे सामन्यांचे पारडे क्षणाक्षणाला झुकत होते. अगदी शेवटच्या चेंडू पर्यंत विजेते कोण हे भाकीत करणे अशक्य होते. विविध बांधकाम व्यावसायिकांसोबतच त्यांचे कुटुंबीय व कर्मचाऱ्यांनी देखील या सामन्याचा आनंद घेतला.

स्पर्धेच्या नियोजनामध्ये नाशिक मेट्रोचे माजी अध्यक्ष उमेश वानखेडे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी क्रेडाई नाशिक मेट्रोचे अंजन भलोदिया, शिवम पटेल, अभिषेक मोरे, निषित अटल, तुषार संकलेचा, शुभम राजेगावकर, सुशांत गांगुर्डे, निरंजन शहा आदींनी परिश्रम घेतले.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ क्रेडाई नाशिक मेट्रोच्या सर्वसाधारण बैठकीत होईल.

# ट्रकच्या धडकेत मोटरसायकलस्वार ठार

**नवापूर ।** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा नवापूर-धुळे रस्त्यावर सावरट गावाजवळ ट्रकच्या धडकेने मोटरसायकलस्वार ठार झाल्याची घटना घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, दुपारी ३ वाजेदरम्यान सुरतकडून धुळ्याकडे जाणारी ट्रक (क्र.जी.जे.०९ व्ही ८५२९) आणि मोटरसायकल (क्र.एम.एच.३९ पी ५४६) यांच्यात जोरदार धडक झाली. सदर घटना नवापूर तालुक्यातील सावरट गावालगत घडली. मोटरसायकल चालक हा महेंद्र अमृतसिंग गावित जागीच ठार झाला आहे. अपघात एवढा भीषण होता की मोटरसायकल चालक महेंद्र गावित याचा चेहरा पूर्ण टायरखाली दाबला गेल्याने चेहर्याचा चुराडा झालेला दिसून आला.

# शिवसेना नाशिक महानगरतर्फे भव्य भजन महोत्सवाचे आयोजन

**नाशिक । प्रतिनिधी**

देव, देश आणि धर्म हा मूळ मंत्र शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सर्व शिवसैनिकांना दिला. शिवसेना वर्धापन दिनानिमित्त सुरू असलेल्या भगवा महिना अंतर्गत आषाडी एकादशीचे औचित्य साधून रविवार दि. १६ जुलै रोजी शिवसेना नाशिक महानगरतर्फे भव्य भजन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. पुरुष आणि महिला अशा दोन गटांत या स्पर्धा होणार असून दोन्ही गटांना स्वतंत्र पारितोषिके देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर प्रत्येक मंडळास स्मृतीचिन्हे, प्रमाणपत्र व सहभागी झालेल्या भजनी मंडळाच्या प्रत्येक सदस्याला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या भजन महोत्सवासाठी प्रत्येक भजनी मंडळात वादकासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ सदस्य असावेत. वादन साहित्य मंडळाने स्वतः आणायचे असून प्रत्येक भजनी मंडळाला १० ते १५ मिनिटांचा वेळ देण्यात येणार येणार आहे. भजनी मंडळाची नोंदणी विनामूल्य असून नोंदणी सोमवार दि. १० जुलै दुपारी चार वाजेपर्यंत स्वीकारण्यात येणार आहे. नाशिक शहर व जिल्ह्यातील अधिकाधिक भजनी मंडळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी केले आहे. याप्रसंगी सह संपर्क प्रमुख राजू लवटे, महानगर प्रमुख प्रविण तिदमे उपस्थित होते.

अधिक माहितीसाठी आकाश कोकाटे - ८८८८५५२५५२ व शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर जिल्हा ०२५३४०१८९९९ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. भजन स्पर्धेचे नियम व अटी पुढीलप्रमाणे आहेत. साठ वर्षाच्या आतील स्त्री-पुरुष आपल्या ग्रुपसह भजनी मंडळात सहभाग घेऊ शकतील.भजनी मंडळाचा किमान पाच व्यक्तिंचा ग्रुप असणे आवश्यक. भजन महोत्सवात भजन सादरीकरणासाठी विहीत नमुन्यातील अर्ज भरणे आवश्यक. भजनाला साजेशी वेषभूषा करुन भजन सादर करणा-यांचे विशेष स्वागत आहे. कोणत्याही भारतीय भाषेतील भजन सादरीकरण करण्याची मुभा आहे. भारतीय संत विरचित भजन सादरीकरण करणारांचे स्वागत आहे. तर भजन महोत्सव ही स्पर्धा नसून सादरीकरण आहे तथापि परफॉर्मन्सनुसार भजनी संघाला आकर्षक बक्षीस देऊन गौरविण्यात येईल. भजन महोत्सवात प्रवेश मर्यादित आहेत प्रवेशिका स्विकारण्याच्या किंवा नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळाने राखून ठेवला आहे.

# नॉर्थ पॉईंट स्कूलची राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत सुवर्ण कामगिरी

### दोघा खेळाडूंची महाराष्ट्राच्या संघात निवड

**धुळे । प्रतिनिधी**

नाशिक येथे झालेल्या ७ व्या राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था संचलित नॉर्थ पॉईंट स्कूल देवपूर धुळेच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर झेंडा फडकविला असून कु.वृत्तिका येशी व कु.तेजस्विनी वाघ ह्या खेळाडूनी उत्कृष्ठ कामगिरी बजावल्याबद्दल त्यांची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. नॉर्थ पॉईंट स्कूलने क्रीडा क्षेत्रात सुवर्ण कामगिरी केल्याने खेळाडूंचे क्रिडा विश्वातून कौतुक करण्यात येत आहे.



याबाबत सविस्तर वृत्त असे कि, २३व्या जागितिक ऑलिम्पिक दिनानिमित्ताने महाराष्ट्र सिक्स साईड इनडोअर हॉकी असोसिएशनचे नाशिक जिल्हा इनडोअर हॉकी असो. आणि नाशिक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिक येथे ७ व्या राष्ट्रीय सिक्स अ साईड हॉकी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून २२ राज्यातील ४५० महिला व पुरूष खेळाडू सहभागी झाले होते. स्पर्धेचे उद्घाटन व्दारका आखाडाचे व्दारकाधिश जगतगुरू शंकराचार्य महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय हॉकी स्पर्धेत श्री शिवाजी विद्या प्रसारक संस्था धुळे संचलित नॉर्थ पॉईंट स्कूल देवपूर धुळेच्या खेळाडूंनी दैदिप्यमान यश मिळवित सुवर्ण कामगिरी केली. नॉर्थ पॉईंट स्कूलची विद्यार्थीनी कु. वृत्तिका येशी व कु.तेजस्विनी वाघ या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ करीत परिक्षक आणि क्रीडा रसिकांचे लक्ष वेधून घेतले होते. या हॉकी स्पर्धेत त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल दोघा खेळाडूंची महाराष्ट्राच्या संघात निवड झाली आहे. या आधी ह्या खेळाडूंनी दोन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला होता तसेच नॉर्थ पॉईंट स्कूलच्या खेळाडूंनी सुवर्ण पदकही पटकाविले होते. महाराष्ट्राच्या हॉकी संघात निवड झाल्याबद्दल खेळाडूंचे संस्थेचे चेअरमन आ. कुणाल पाटील, अश्विनी कुणाल पाटील, प्राचार्या जे.आर. नेल्सन यांच्यासह शिक्षक,शिक्षिका व कर्मचारी वृंदांनी कौतुक केले आहे. या खेळाडूंना क्रिडा शिक्षक मोसीन शेख यांचे मार्गदर्शन मिळाले.

ADMISSION शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था ADMISSION

विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे

NAAC Accredited 'B' Grade

वडेल रोड, एमएसईबीजवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc | B.C.A | M.M.S./ M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या S.Y. Bsc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क - प्रा. ललिता निकम - ८८६२०४४७९१ प्रा. जागृती पाटील - ७८८७९३४३६५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक, कोड नं. 5299A

B.A., B.C.A., B.Sc., M.A. M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल

संपर्क - प्रा. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७ श्री. नितेश पाटील - ९९२२११६४३८

प्रा. भुषण पाटील - ७७०९१००७९८

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. कोड नं. 2053

P.G.D.M.L.T.

Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता - बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, मायक्रो बायोलॉजी/बी.फार्म/बी.ए.एम.एस/बी.डी.एस./एम.बी.बी.एस.

- संपर्क - प्राचार्य डॉ. के. बी. पाटील ९४२२२८८५१८, सौ. शारदा पाटील - ९४२३४९६३४४

प्राचार्य. डॉ. आर.बी. पवार - ९४२०३७५७३५

प्रा. डॉ. योगेश बोरसे - ९४२३३७८९३६ श्री. हर्षल पाटील - ९४२१२८३५७७





# भाजप दिव्यांग विकास आघाडीतर्फे विठ्ठल-रुक्मिणीची महाआरती















नाशिक ।
भाजप दिव्यांग विकास आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष बाळासाहेब घुगे यांच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी मंदिर, वृंदावन चौक, सिडको येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने व नाशिक पश्चिमच्या आमदार सीमा हिरे यांच्या वाढदिवसानिमित्त विठ्ठल रुक्मिणी मातेची अभिषेक व महाआरती करण्यात आली. दरम्यान विठू नामाचा गजर करत हजारो नागरिक या वारीमध्ये सहभागी झाले. लहान थोर प्रत्येक जण यावेळी विठू नामाचा गजर करताना दिसून आला. शहरामध्ये असलेल्या विठ्ठल मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली. विठ्ठलांची  रांगोळी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचं लक्ष वेधून घेत आहे. यावेळी बाळासाहेब घुगे यांनी आ. सीमा हिरे यांना दीर्घायुष्य लाभो अशी पार्थना केली. तर भक्तांना उपवासाच्या निमित्ताने केळी व राजगिरा लाडू वाटप करण्यात आले, शेकडो भक्तांनी दर्शनासाठी आल्यानंतर केळी व राजगिरा लाडू प्रसादाचा लाभ घेतला. मंदिरात सुरवातीला आरती करण्यात आली. या कार्यक्रमास भाजपा महिला मोर्चा प्रदेश महामंत्री छाया देवांग, अर्चना दिंडोरकर, यमुना घुगे, राजेंद्र जडे, प्रवीण मोरे, उत्तम काळे, दिलीप देवांग, प्रकाश चकोर, सार्थक घुगे, अशोक निकमसह दिव्यांग बांधव उपस्थित होते. तसेच प्रभागातील बहुसंख्य भाविक व भाजपा पदाधिकारी उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे आभार बाळासाहेब घुगे यांनी मानले.

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# त्र्यंबकेश्वरला पावसाची जोरदार बॅटिंग, रस्त्यांवर पाणीच पाणी















नाशिक । यंदा महाराष्ट्रात मान्सूनने उशिरा हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी रिमझिम पाऊस सुरु आहे. त्र्यंबकेश्वर परिसरात पावसाची जोरदार बॅटिंग सुरु आहे. गावातील अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याने पूरसदृश्य स्थिती निर्माण झाली आहे. त्र्यंबकमधील मेनरोड, लक्ष्मीनारायण चौक, तेली गल्ली, कदम गल्लीत पाणी साचले आहे. तसेच नगर परिषदेच्या समोर पाणी साचल्याने विद्यार्थी आणि यात्रेकरूंचे हाल होत आहे. नालेसफाई झाली नसल्यामुळे त्र्यंबकला पूरसदृश स्थितीचा सामना करावा लागल्याची चर्चा गावकऱ्यांमध्ये सुरु आहे. सुदैवाने दिवसा ही स्थिती उद्भवल्याने गावकऱ्यांना आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागला नाही. दरम्यान, मान्सूनने पूर्ण महाराष्ट्र आणि देश व्यापला असला तरी पावसात जोर नाही. अजूनही नाशिक जिल्ह्यात अनेक ठिकाणी पेरणी योग्य ओल बर्याच तालुक्यात म्हणजे पूर्व भागात झालेली नाही. मध्य भागात पुरेशी ओल आहे. जिल्ह्याच्या पश्चिम पट्ट्यात चांगल्यापैकी ओल आहे. मान्सून किनारपट्टी भागात सक्रिय आहे. मुंबई, पालघरसह नाशिक जिल्ह्यात त्र्यंबकेश्वर, घोटी, इगतपुरी, पेठ, सुरगाणा या कोकणालगत असलेल्या भागात मान्सून सक्रिय आहे. जसे जसे पूर्वेला जावे तसा तसा पाऊस कमी होत जातो. त्यामुळे जिथे पेरणी योग्य ओल आहे तिथेच पेरणी करावी, असा सल्ला कृषी विभागाने दिला आहे.